महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९०८ /२०२२ दि. २२/११/२०२२

## –:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी**, एम.एम.आर.डी.ए. कडून भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका अंतर्गत तहसिलदार ऑफिस (दिघे चौक) ते शांतीनगर चौक दरम्यान दोन्ही वाहिनीवर सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम करण्यात येणार असुन रस्त्याचे खोदकाम करण्यात येणार आहे. नमूद वाहिनीवरून जाणाऱ्या दुचाकी, तीन चाकी, प्रवासी व माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या चारचाकी व जड–अवजड वाहनांना प्रवेश बंद करून पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद :–** १) तहसिलदार ऑफिस (दिघे चौक) ते अमजदिया मस्जिद पावेतो दुचाकी, तीन चाकी व लहान वाहनां करीता एकेरी वाहतूक (ONE WAY) करण्यात येत आहे. नमूद मार्गावरून तहसिलदार ऑफिस (दिघे चौक) कडून अमजदिया मस्जिदकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना दिघे चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने तहसिलदार ऑफिस (दिघे चौक) ते नागाव मार्गे तसेच तहसिलदार ऑफिस (दिघे चौक) ते मुरलीधर कम्पाउंड कडून अमजदिया मस्जिद मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** २) शांतीनगर के. जी. एन चौक येथून दिघे चौकाकडे जाणाऱ्या जड – अवजड वाहनांना अमजदिया मस्जिद येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने शांतीनगर के. जी. एन. चौक येथून वफा जंक्शन कडुन डावीकडे वळण घेवुन अमजदिया मस्जिद समोरून सुभाषनगर मार्गे बाबला कंपाउंड व मुरलीधर कंपाउंड मार्गे तसेच अमजदिया मस्जिद येथून नागाव मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद :–** ३) शांतीनगर के.जी.एन.चौक येथून आनंद दिघे चौककडे जाणा–या लहान वाहनांना (दुचाकी, तीनचाकी) पंचायत समिती क्वॉर्टर्स येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने शांतीनगर के.जी.एन चौक येथून पंचायत समिती क्वॉर्टर्स मार्गे डावीकडे वळून घेवुन साईनगर मार्गे अशोकनगर गेट नं. १ व नं. २ येथून इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसुचना प्रत्यक्ष रस्त्याचे काम सुरु झाल्यापासुन ते काम पुर्ण होई पर्यत अंमलात राहिल.

सदरची अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील व सदर कामातील वाहनांना लागु होणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

प्रत माहितीसाठी सादर
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामिण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner